९/१

# वसई विरार शहर महानगरपालिका

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ | सभा सुचना क्र. ३ | दिनांक : ७/६/२०११

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका (पाणीपुरवठा व विशेष पाणीपट्टी) उपविधी २०११ च्या मसुदयास मान्यता देऊन प्रसिद्धी देणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट भुतपूर्व खालील संस्थाचे पाणीपुरवठा विषयक उपविधी मंजूर आहेत.

१) विरार नगरपालिका (पाणीपुरवठा व विशेष पाणीपट्टी) उपविधी १९८९

२) नवघर-माणिकपूर नगरपरिषद (पाणीपुरवठा व विशेष पाणीपट्टी) (उपविधी १९९९)

यामध्ये सुधारणा करून विनापरतावा/अर्धपरतावा नळ जोडणी अनामत भरणेकामी पद्धत व स्वरुप ठरविणे. तसेच नळजोडणी बाबतच्या अटी-शर्ती ठरविणे संदर्भिने संबंधित संस्थांनी सुधारणा उपविधी मंजूर केले आहेत.

१) विरार नगरपालिका (पाणीपुरवठा व विशेष पाणीपट्टी) (सुधारणा उपविधी १९९७)

तद्नंतर पाणीपुरवठा योजनेवरील खर्च व नवीन नळ जोडण्याकामी पाईप लाईनची व्यवस्था करणेसाठी येणाऱ्या भांडवली खर्चाकरिता निधी उपलब्ध करण्यासाठी या रक्कमामध्ये वाढ करणे व विनापरतावा अनामत या लेखाशिर्षाऐवजी नळजोडणी आकार हे शिर्ष ठरविणेकामी निर्णय घेण्यांत आला. या संदर्भाने सादर केलेले विरार नगरपालिका (पाणी पुरवठा व विशेष पाणीपट्टी) (सुधारणा उपविधी १९९९) बाबत उपविधीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता नसून नगरपालिका विशेष सभेच्या ठरावाद्वारे उपविधीमधील दर व रक्कम हयामध्ये बदल करण्यास सक्षम असून तद्नुसार कार्यवाही करण्याचे निर्देश प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन व आयुक्त कोकण विभाग यांनी जुलै ९९ मध्ये दिले व तेव्हापासून सध्याचे प्रचलित नळ जोडणी आकाराचे दर अंमलात आहेत.

गत १२ वर्षात या दरामध्ये सुधारणा झालेली नाही. लोकसंख्येचा भार वाढलेला आहे. नगरपालिकेला दरडोई प्रतिदिन १०० लिटर इतका पाणी पुरवठा करण्याचे बंधन होते. महानगरपालिकेला दरडोई प्रतिदिन १३५ लिटर इतका पाणीपुरवठा करण्याचे बंधन आहे. लोकसंख्येच्या वाढीचा दर विचारात घेता भविष्य काळात पाणीपुरवठा करणेकामी नविन स्त्रोत उपलब्ध करणे आवश्यक झाले आहे.

प्रतिदिन २०० दशलक्ष लिटर पाण्याची उपलब्धता असलेले सुसरी धरण या उद्भवाचा विकास करणे अथवा राजावली,सातीवली,कामण, कोलसा पाडा इ. अन्य उद्भव निर्माण करुन त्यातून पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. नविन पाणीपुरवठा स्त्रोत निर्माण करणे नविन योजना कार्यान्वित करणे किंवा उपलब्ध असलेल्या योजनांची क्षमता वृद्धी अथवा अनुषंगीक भांडवली सुधारणा करून पाणी पुरवठा करणेकामी निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे. पाणीपुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्याचे शासनाचे निर्देश आहेत.

पुढील १० वर्षात वाढीव लोकसंख्येनुसार आवश्यक पाणीपुवरवठयाचा विचार करता पाणीपुरवठा स्त्रोत विकसित करणेकामी रु. ४०० कोटी पेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिका यासाठी कर्ज उभारणी करण्याचा प्रयत्न करणार आहे. परंतु यामुळे निर्माण होणारा खर्चाचा भार भविष्यकालीन नळजोडणी धारकावर समप्रमाणात विभागला जाणे अनिवार्य आहे. भविष्यकालीन पाणीपुरवठा लाभार्थ्यांकडून योजनेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणे योग्य व आवश्यक असल्याने नळजोडणी मंजूर करताना वसुल करावयाच्या नळजोडणी आकारामध्ये व आकार भरण्याच्या पद्धतीमध्ये खालील प्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | मालमत्तेचे स्वरुप | प्रस्तावित दर | प्रचलित दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विरार | नालासोपारा | नवघर-माणिकपूर | वसई |
| १ | आर.सी.सी. इमारतीमधील सदनिका | | प्रति सदनिका नळजोडणी आकार | | | |
| अ | एक खोली व स्वयंपाक घर | १०,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | १,५००/- |
| ब | एक दिवाणखाना, एक खोली व स्वयंपाक घर | १५,०००/- | - | - | - | - |
| क | एक दिवाणखाना, स्वयंपाक घर व दोन किंवा अधिक खोल्या | २०,०००/- | - | - | - | - |
| २ | सामाईक गॅलरी असलेल्या आर.सी.सी. व लोड बेरींग इमारती | | प्रति सदनिका नळजोडणी आकार | | | |
| अ | एक खोली व स्वयंपाक घर | ८,०००/- | ३,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | १,५००/- |
| ब | एक दिवाणखाना, एक खोली व स्वयंपाक घर | १२,०००/- | - | - | - | - |
| क | एक दिवाणखाना, स्वयंपाक घर व दोन किंवा अधिक खोल्या | १५,०००/- | - | - | - | - |
| ३ | बैठी चाळ (शौचालय आत) प्रति सदनिका नळजोडणी आकार रक्कम रुपये | ५०००/- | ३,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | १,०००/- |
| ४ | बैठी चाळ (शौचालय बाहेर) प्रति सदनिका नळजोडणी आकार रक्कम रुपये | ४०००/- | २,०००/- | ५००/- | ५००/- | ५००/- |
| ५ | मातीची भिंत, कौलारु घर प्रति सदनिका | ५०००/- | २,०००/- | ५००/- | ५००/- | ५००/- |

D:Sanjay Sir Rajesh Sir

Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नळजोडणी आकार रक्कम रुपये | | | | | |
| ६ | झोपडी प्रति झोपडी नळजोडणी आकार रक्कम रुपये | १०००/- | ३००/- | ३००/- | १०००/- | ३००/- |
| ७ | आर.सी.सी. बंगले रक्कम रुपये | २०,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- |
| ८ | उपहार गृह 'अ' दर्जाचे नळजोडणी आकार रक्कम रुपये | ३०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- |
| ९ | उपहार गृह 'ब' दर्जाचे नळजोडणी आकार रक्कम रुपये | २५,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- |
| १० | उपहार गृह 'क' दर्जाचे नळजोडणी आकार रक्कम रुपये | २०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- |
| ११ | परमिट रुम/लॉज नळजोडणी आकार रक्कम रुपये | ३०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- |
| १२ | नर्सिंग होम नळजोडणी आकार रक्कम रुपये | ३०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- |
| १३ | दवाखाना नळजोडणी आकार रक्कम रुपये | २०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- |
| १४ | व्यवसाईक संकुल प्रती दुकान नळजोडणी आकार रक्कम रुपये | १५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | - |
| १५ | सिनेमागृह १ पडदा नळजोडणी आकार रक्कम रुपये | २५,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- |
| १६ | डेअरी, कॅन्टीन, लग्न हॉल, बेकरी, आईस फॅक्टरी नळजोडणी आकार रक्कम रुपये | २०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | १५.०००/- |
| १७ | सर्व प्रकारचे कारखाने नळजोडणी आकार रक्कम रुपये (फक्त पिण्याच्या पाण्यासाठी) | ५०,०००/- | १५,०००/- | १५,०००/- | १५,०००/- | १५,०००/- |
| १८ | अनाथाश्रम,वृद्धाश्रम,अनुदानित ,वसतीगृह, धार्मिकसंस्था, अनुदानित शाळा, महाविद्यालय नळजोडणी आकार रक्कम रुपये | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- |
| १९ | विना अनुदानित शाळा, विना अनुदानित वसतीगृह व महाविद्यालय नळजोडणी आकार रक्कम रुपये | २०,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ४,०००/- |
| २० | शासकीय कार्यालय नळजोडणी आकार रक्कम रुपये | १०,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- |
| २१ | क्लब हाऊस | ३०,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- |
| २२ | कार्यालय, बँक व व्यवसाईक गाळे २५०० क्षेत्रफळापर्यंत | ३०,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | ५,०००/- |

नळजोडणी फी, रस्ता खोदाई शुल्क व विशेष पाणीपट्टी इ. दर पूर्वीप्रमाणे पुढे सुरु ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

नळजोडणी आकार भरण्याची पद्धत व स्वरुप तसेच नळजोडणीच्या अटी-शर्ती याबाबतचा निर्णय महानगरपालिका वेळोवेळी ठरविल त्याप्रमाणे असेल.

सुधारीत उपविधीचा प्रारुप मसुदा सोबत जोडला आहे. याबाबत चर्चा होऊन मसुदा मान्य करून आवश्यक ती प्रसिद्धी देऊन पुढील कार्यवाही करणेस मान्यतेस्तव मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे.

**निर्णय :-** १) झोपडीमध्ये अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती मधील नागरीकांचे प्रमाण अधिक असते या शिवाय अन्य अत्यंत गरीब कुंटुबे वास्तव्य करीत असतात. सबब झोपडीसाठी जोडणी नळ मंजूरी करीता नळ जोडणी आकाराच्या रक्कमेत वाढ न करता रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रु. तीनशे फक्त) प्रति झोपडी इतके पूर्वीचेच दर पुढे सुरु ठेवण्यात यावेत. तथापी एका समुहातील बारा झोपडयांसाठी एक या प्रमाणे झोपडीसाठी समुह नळ जोडणी अनुज्ञेय असेल.

२) बंगले

अ) दोन खोल्या, एक दिवाणखाना व स्वयंपाक घर असलेले नळ जोडणी आकार रक्कम रुपये २००००/-

ब) तीन व त्यापेक्षा अधिक खोल्या एक दिवाणखाना व स्वयंपाक घर असलेले नळ जोडणी आकार रक्कम रुपये २५०००/-

३) सर्व प्रकारचे कारखाने मोठे उद्योग, लघु उद्योग व कुटीर उद्योग असे वर्गीकरण करुन

अ) मोठया उद्योगासाठी २६ पेक्षा अधिक मनुष्य बळ असणारे उद्योग रक्कम रुपये ५०,०००/-

ब) लघु उद्योगासाठी ११ ते २५ मनुष्य बळ असणारे उद्योग रक्कम रुपये ३५,०००/-

क) कुटीर उद्योगासाठी १० पेक्षा कमी मनुष्य बळ असणारे उद्योग रक्कम रुपये २५,०००/- असे दर निश्चित करण्यात यावेत.

४) नळ जोडणीची मागणी केलेली निवासी/घरगुती वापर असलेली मालमत्ता महानगरपालिका क्षेत्रात हया सभेच्या सुचना दिनांका पुर्वीपासून म्हणजे दिनांक २७/५/२०११ पूर्वीपासून अस्तित्वात असल्याचा मालमत्ता कर पावती, विद्युत मिटर जोडणी पुरावा, दुरध्वनी जोडणीचा पुरावा हयापैकी कोणताही पुरावा सादर केल्यानंतर मालमत्तेच्या प्रकारानुसार या प्रस्तावित सुधारणे नुसारच्या नळ जोडणी आकाराच्या दरामध्ये ५०% सवलत अनुज्ञेय असेल.

५) संकुलातील प्रत्येक औद्योगिक गाळ्यासाठी नळ जोडणी आकार रक्कम रुपये २०,०००/- निश्चित करण्यात यावा.

६) मातीची भिंत, कौलारु घर प्रति सदनिका नळ जोडणी आकार रक्कम रुपये ४०००/- असा बदल करावा.

७) सिनेमा गृहासाठी प्रति पडदा नळजोडणी आकार रु. २५,०००/-

D:Sanjay Sir\Rajesh Sir

Scanned by CamScanner

अ) उपहार गृह अ व ब दर्जाचे (५०० चौ. फुटापेक्षा अधिक चटई क्षेत्र असलेले) नळ जोडणी आकार रक्कम रुपये ३००००/-

ब) उपहार गृह क दर्जाचे (वडा,उसळ,मिसळ,चहा,कॉफी इ.पदार्थ तयार करून विक्री करणारे/ ५०० चौ. फुटापेक्षा कमी चटई क्षेत्र असलेले) नळ जोडणी आकार रक्कम रुपये २००००/-

९) परमीट रुम / लॉजसाठी नळ जोडणी आकार रक्कम रुपये ४००००/- असेल.

१०) दुग्धालय, कॅटिंन व बेकरी साठी नळ जोडणी आकार रक्कम रु २०,०००/- असेल.

११) डेअरी साठी नळ जोडणी आकार रक्कम रु५०,०००-/- असेल.

१२) आईस फॅक्टरीसाठी नळ जोडणी आकार रक्कम रु. १,००,०००/- असेल.

१३) लग्न हॉलसाठी नळ जोडणी आकार रक्कम रु. १,००,०००/- असेल.

१४) प्रस्तावित अनु.क्र. १८ मध्ये अनुदानित शाळा ऐवजी इंग्रजी माध्यमाच्या शाळा असा बदल करावा.

१५) प्रस्तावित अनु.क्र. २२ मध्ये व्यवसायिक मजकूराऐवजी कार्यालय, बँका व इतर सेवा पुरविणाऱ्या संस्था असा मजकूर नमूद करुन नळ जोडणी आकार रक्कम रु. ३०,०००/- इतकाच असेल.

१६) जिल्हा परिषद शाळा, मराठी, हिंदी, गुजराथी व उर्दु माध्यमाच्या खाजगी धर्म निरपेक्ष शाळा, व्यसन मुक्ती केंद्रे, अपंग पुनर्वसन केंद्रे व इतर विश्वस्त नोंदणीकृत धर्मनिरपेक्ष धर्मदाय संस्थांना (अन्यथा व्यवसायिक प्रयोजन नसल्यास) १००% सवलत असेल.

१७) स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांच्या विधवा पत्नी यांच्या एका राहत्या घरासाठी नळ जोडणी आकारामध्ये ५०% सुट असेल.

१८) महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट भुतपूर्व संस्था व महानगरपालिकेच्या योजनांमुळे बाधित झालेल्या भुधारकांना नळ जोडणी आकारामध्ये १००% सुट असेल.

१९) कोणताही जोडणी नळ अनधिकृतपणे गैरमार्गाने या उपविधीचे उल्लंघन करून घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आल्यास मालमत्ता प्रकारानुसार अनुज्ञेय नळ जोडणी आकाराच्या तिप्पट दराने नळ जोडणी आकार वसुल करणे, जोडणी नळ घेतल्याच्या संभाव्य दिनांकापासूनची तिप्पट दराने पाणीपट्टी रक्कम वसुल करणे, अधिनियम कलम ४६८ नुसार शास्तीची कार्यवाही करणे, यासह नळ जोडणी खंडीत करुन फौजदारी गुन्हा दाखल करणेच्या कार्यवाहीस संबंधित नळ जोडणी धारक पात्र असेल.

२०) पाण्याच्या वाणिज्यीक / व्यावसायिक / औद्योगिक वापरासाठीचे सद्याच्या दरामध्ये १००% वाढ करुन दुप्पट दरामध्ये आकारणी व वसुली करण्यात यावी.

२१) उपरोक्त सुधारणासह प्रस्तावित वसई-विरार शहर महानगरपालिका (पाणी पुरवठा व विशेष पाणीपट्टी) उपविधी २०११ च्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५९ नुसार आयुक्त यांनी सादर केलेला मसुद्यावर चर्चा करून आवश्यक इतर फेरफार करुन सदर उपविधीचा मसुदा मान्य करण्यात येत आहे. व यांच अधिनियमाचे कलम ४६० नुसार,

(अ) सदर मसुदयांची प्रत नागरीकांसाठी पाहणी करता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात मोफत उपलब्ध ठेवावी.

ब) सदर ठरावाच्या प्रतीसह उपविधीच्या मुद्रीत प्रती ज्या नागरीकांना आवश्यक असतील त्यांना विक्रीसाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील पाणीपुरवठा विभागाकडे उपलब्ध ठेवाव्या.

क) सदर उपविधीच्या मसुद्याबाबत नागरीकांचे काही आक्षेप, हरकती, सुचना असल्यास त्या जाहिर सुचना वृत्तपत्रात व महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्दी झालेपासून ४५ दिवसांपेक्षा कमी नसलेल्या सुचनेत नमुद दिनांकापर्यंत सादर करता येतील

ड) उपरोक्त २१ (अ) ते (क) बाबत जाहिर सुचना वृत्तपत्रात तसेच महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिद्ध करण्यात यावे.

ई) वृत्तपत्रांतील जाहिर सुचनेनुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या हरकती, सुचना, आक्षेपाचा विचार करून तद्नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

वरील प्रमाणे कार्यवाही करणेस प्रशासकीय व याकामी येणाऱ्या खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. हयाबाबत सभा दि. ७/६/२०११ रोजी पर्यंत ज्या व्यक्तीने मालमत्ता कर आकारणी विभागीय कार्यालयांत अर्ज सादर केले असतील त्या व्यक्तीस सध्या स्थितीतील प्रथमिक दराप्रमाणेच नळ जोडणी आकरणी व फी घेण्यास ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.

सही:-
सुचक :- ( उमेश नाईक )

सही:-
अनुमोदक :- ( विनायक निकम )

ठराव सर्वानुमते मंजूर

सही:-
महापौर तथा पिठासिन अधिकारी
वसई विरार शहर महानगपालिका

सत्य प्रत
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner